**CNR No. :- MHSI100003092018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–

## –: निशाणी ९२ वरील आदेश :–

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १६ चे कायदेशीर वारसांना दाव्यामध्ये सामील करुन तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी केला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १६) श्रीम. सिताबाई रामा ठाकुर ही दि.१२/०७/२०२३ रोजी मयत झालेली आहे. प्रतिवादी क्र. १६ हिचे वारस मुलगे प्रतिवादी क्र. १४ व प्रतिवादी क्र. १५ हेच आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १६ हिच्या नावासमोर मयत असे नमुद करुन प्रतिवादी क्र. १६ हिचे नाव कमी करण्याबाबत दुरुस्ती दाव्याच्या कामी करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाकामी प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी यांना अर्जाकामी म्हणणे सादर करण्याची उचित संधी उपलब्ध करुन देऊनही त्यांनी त्यांचे म्हणणे विहीत मुदतीत सादर न केलेने दि.०९/०७/२०२४ च्या आदेशान्वये त्यांच्या विरुद्ध सदरचा अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

०४. अर्ज व कागदपत्रांचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादी क्र. १६ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. वारस अभिलेखावर आणण्यास विलंब केलेला आहे. परंतु, केवळ

विलंब झाला म्हणुन वारस अभिलेखावर सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. त्याचप्रमाणे वादीने केलेला विलंब क्षमापीत करुन वादीचा नि.क्र.९० कडील विलंब माफीचा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. तदनुषंगे वादी मागत असलेली दुरुस्ती दाव्याच्या गुणदोषावर निकाली करण्यासाठी महत्वाची असल्याचे दिसून येते. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**–:: आदेश ::–**

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय प्रतिवादी क्र. १६ चे वारसांना प्रस्तुत अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यामध्ये तशी दुरुस्ती करुन समाविष्ट केल्यावर दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. विहीत मुदतीत अ.क्र.२ कडील आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
KUMBHAR
RANJANA GOVIND
Date: 2025.04.08
16:16:49 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (आर. जी. कुंभार)

दिनांक – ०८.०४.२०२५. जादा सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)

दोडामार्ग.